# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 18 February 2025

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १८ फेब्रुवारी २०२५ दुपारी १.०० वा.

****

छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उद्या साजरी होणार असून, त्यानिमित्त राज्यभरात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

पुण्यात महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठानच्या वतीनं आंबेगाव ब्रुद्रुक इथं साकारत असलेल्या शिवसृष्टीच्या दुसर्या टप्प्याचं लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्या होणार आहे. शिवजयंती महोत्सव समितीतर्फे उद्या सकाळी लालमहालातून शिवजन्मोत्सव स्वराज्यरथ सोहळा ही मिरवणुक काढण्यात येणार आहे.

शिवजयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे स्वराज्य सप्ताहाचं आयोजन करण्यात आलं आहे. येत्या २७ फेब्रुवारीपर्यंत साजऱ्या होणाऱ्या सप्ताहादरम्यान शोभायात्रा, व्याख्यान, चित्र आणि पुस्तकांचं प्रदर्शन, शिवकालीन वस्तूंचं प्रदर्शन तसंच किल्ले, गडकोट आणि दुर्ग स्वच्छता मोहीम इत्यादी कार्यक्रम होणार आहेत.

****

परभणी जिल्ह्यात जिंतूर तालुक्यातल्या कौसडी इथल्या जिल्हा परिषद शाळेच्या मैदानावर विद्यार्थ्यांनी मानवी साखळीद्वारे शिवरायांची भव्यदिव्य अशी प्रतिकृती साकारली होती. ९९५ विद्यार्थी यात सहभागी झाले होते.

नांदेड इथं उद्या जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने "जय शिवाजी- जय भारत पदयात्रा" काढण्यात येणार आहे. शहरातल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यापासून या पदयात्रेला सुरुवात होणार आहे.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात शिवजयंतीनिमित्त विविध कार्यक्रम होत आहेत. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने क्रांती चौक परिसरात शिवोत्सव सुरु असून, आज यात ज्येष्ठ इतिहास संशोधक आणि महाराष्ट्र शासनाच्या दुर्ग संवर्धन समितीचे मुख्य मार्गदर्शक पांडुरंग बलकवडे यांचं 'शिवरायांची अष्टक्रांती' या विषयावर व्याख्यान होणार आहे.

****

बीड जिल्ह्यातल्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणी मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर आरोप होत असतील, तर त्यांनी नैतिकतेच्या आधारावर राजीनामा द्यावा, अशी मागणी खासदार सुप्रिया सुळे यांनी केली आहे. मस्साजोग इथं आज देशमुख कुटुंबियांची भेट घेतल्यानंतर त्या बोलत होत्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून खूप अपेक्षा असून, त्यांनी या प्रकरणात विशेष लक्ष द्यावं, याप्रकरणी त्यांची भेट घेणार असल्याचं सुळे यावेळी म्हणाल्या.
दरम्यान, २५ फेब्रुवारी पर्यंत या प्रकरणी न्याय मिळाला नाही तर अन्नत्याग आंदोलन करण्याचा इशारा देशमुख कुटुंबियांसह मस्साजोग ग्रामस्थांनी दिला आहे.

****

काँग्रेसचे नवे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी आज मुंबईतल्या टिळक भवनमध्ये मावळते प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्याकडून अध्यक्षपदाचा कार्यभार स्वीकारला. यावेळी काँग्रेसचे प्रभारी रमेश चेनिथला, विधिमंडळ गटनेते विजय वडेट्टीवार, मुकुल वासनिक यांच्यासह काँग्रेसचे प्रमुख नेते उपस्थित होते.

****

हिंगोली जिल्ह्यातल्या ग्रामसेवक संघटनेनं आपल्या विविध मागण्यांसाठी आजपासून असहकार आंदोलन सुरू केलं आहे. जिल्ह्यातल्या आदर्श ग्रामसेवक पुरस्कारांचं मागील पाच वर्षापासून रखडलेलं वितरण तातडीने करावं, आश्वासित प्रगती योजनेचा लाभ द्यावा, डोंगरकडा इथल्या चौदाव्या वित्त आयोगाच्या कामाचं मूल्यांकन करावं, वैद्यकीय प्रतिपूर्तीची देयकं तातडीने निकाली काढावीत, मुद्रांक शुल्काची परिपूर्ण माहिती द्यावी, आदी मागण्या संघटनेनं केल्या आहेत. सुमारे ३०० ग्रामसेवक या आंदोलनात सहभागी झाले आहेत.

****

उत्तर प्रदेशात प्रयागराज इथं महाकुंभमेळ्यात त्रिवेणी संगमात पवित्र स्नान करण्यासाठी भाविकांचा ओघ सुरूच आहे. जगातल्या सर्वात मोठ्या मानवी मेळाव्यात आतापर्यंत सुमारे ५३ कोटी भाविकांनी पवित्र स्नान केल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

दिल्ली इथं होणार्या ९८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासाठी पुणे इथून साहित्यरसिकांना दिल्लीला घेऊन जाणारी विशेष रेल्वे उद्या दुपारी निघणार असून, परवा २० तारखेला रात्री दिल्लीला पोहोचणार आहे. या प्रवासादरम्यान मराठी साहित्ययात्री संमेलन भरवलं जाणार आहे. या रेल्वेला महान सेनानी महादजी शिंदे यांचं नाव देण्यात आलं असून, प्रत्येक बोगीला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या गडकिल्ल्यांची नावं दिली जाणार आहेत. राज्याचे मराठी भाषामंत्री उदय सामंत या संमेलनाचे स्वागताध्यक्ष असून तेही 'मराठी साहित्ययात्री संमेलनात' सहभागी होत रेल्वेतून प्रवास करणार आहेत. २१ ते २३ फेब्रुवारी या कालावधीत दिल्लीत छत्रपती शिवाजी महाराज साहित्यनगरी, ताल कटोरा स्टेडियम इथं अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन होत आहे.

****

महाकुंभमेळ्यासाठी असलेल्या औरंगाबाद-पाटणा-औरंगाबाद या विशेष रेल्वेला परतूर रेल्वे स्थानकावर तात्पुरता थांबा जाहीर करण्यात आला आहे. ही विशेष गाडी औरंगाबाद इथून १९ आणि २५ फेब्रुवारीला सुटेल, तर परतीच्या प्रवासात पाटणा इथून २१ आणि २७ फेब्रुवारीला सुटेल.

****

राज्यातल्या अनुसूचित जातीच्या २५ हजार विद्यार्थ्यांसाठी विविध ठिकाणी वसतिगृह उभारणार असून, यात नांदेड जिल्ह्यातल्या किनवट, माहूर आणि हिमायतनगरचा समावेश असेल, अशी घोषणा राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी केली आहे. नांदेड जिल्ह्यात किनवट इथं आयोजित चौदाव्या जागतिक धम्म परिषदेत ते बोलत होते.

****